## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २७/२/२०२०

**विषय क्रमांक :– २२८७ त्वर्य**

मा.उमेश गायकवाड यांचे दि.२७/२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.२१ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. १०२, अ.क्र.७, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम बांधणे, क्रीडांगणे, मैदाने विकसित करणे, पोहोण्याचे तलाव बांधणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे-२४), पान क्र. २५७ अ.क्र.५०, प्रभाग क्र.२१ ड मध्ये कै.बाळासाहेब कवडे क्रीडांगण येथे विविध विकासकामे करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १)प्रभाग क्र.२१ ड मध्ये उल्हास नगर येथील कपीला डेअरी शेजारी अविष्कार क्रिडा सामाजिक हॉलचे नुतनीकरण करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.२१ ड मध्ये कोरेगाव पार्क दरोडे मळा अस्तित्वातील समाज मंदिराची विविध विकासकामे करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.२१ ड मध्ये कोरेगाव पार्क, संत गाडगे महाराज येथील अस्तित्वातील बुध्द विहाराचे नुतनीकरण करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.२१ ड मध्ये कोरेगाव पार्क, बर्निंग घाट येथील वसाहती मधील रामदेव बाबा समाज मंदिराचे स्थापत्यविषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.२१ ड मध्ये उल्हास नगर येथील सामाजिक हॉलचे उर्वरीत स्थापत्यविषयक कामे करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवाशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– २२८८ त्वर्य**

मा.सौ.सरस्वती शेंडगे, उपमहापौर यांचे दि.२७/२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. २९ अ मधील पर्वती दर्शन भागामध्ये रस्ता कॉंक्रीट करणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०२, अ.क्र. ७, शहरात भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे-१०), पान क्र.२४२, अ.क्र.२३४, प्रभाग क्र. २९ अ मध्ये सारसबाग येथे दक्षिणेस नवीन गेट व पायरी तयार करणे | १० लाख | - |
| **नविन सुचविलेले काम-** | | |
| प्रभाग क्र. २९ अ मधील पर्वती दर्शन भागामध्ये रस्ता कॉंक्रीट करणे | - | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- २२८९ त्वर्य**

मा.धीरज घाटे, सभागृह नेता यांचे दि.२४/२/२०२० चे पत्र.

महाराष्ट्र विकास ग्रुप सर्व्हिस को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, शिवाजीनगर, पुणे ४११००५ ही संस्था महाराष्ट्र सरकारी अधिनियम १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४)कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत झाली आहे. शासन निर्णय क्रमांक - रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७ रोस्वरो-१ अन्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना विना निविदा कामे देणेबाबत निर्णय झालेला आहे. तरी सदर शासन निर्णय नुसार महाराष्ट्र विकास ग्रुप सर्व्हिस को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, शिवाजीनगर, पुणे या संस्थेस पुणे महानगरपालिकेची कामे विना निविदा देणेबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- २२९० त्वर्य**

औंध-बाणेर क्षेत्रिया कार्यालय अंतर्गत विविध मनपाच्या वास्तुंमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसुची ड प्रकरण (५)(२) प्रमाणे सदर सेवकांची सेवा घेतली असल्याने त्यासाठी कार्यरत असणा-या बहुउद्देशीय कामगारांकडून माहे १ एप्रिल २०१८ ते माहे ३१ मार्च २०१९ पर्यंत केलेल्या कामापोटी देयक उपलब्ध असलेल्या एकमेव झाडणकाम निविदा मे.श्री.एंटरप्रायझेस यांच्या (निविदा क्रमांक १-एक्सेंज-२०१९, औंध क्षेत्रिय कार्यालयांतर्गत सन २०१९-२० करीता हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आउटसोर्सिंग पद्धतीने करणे.) निविदेमधून अदा करणेकरीता मान्यता मिळणेसाठी सदर बाब निदर्शनास आणल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. २/११३६ दि.२६/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २२९१ त्वर्य**

मेराज्य शासनाने शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याचा निर्णय घेतलेला . त्यानुषंगाने पुणे महानगरपालिका .आहेप्रशासकीय कार्यालयांचे कामकाज **खालील**प्रमाणे **असणार** आहे -: .

(१) पुणे महानगरपालिकेच्या ज्या विभागांना प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी शासकीय सुटी लागू होती, त्यांनाच दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात येत आहे, त्यामुळे सर्व शनिवार व रविवार हे त्या विभागांना सुट्टीचे दिवस असतील.

(२) कार्यालयांच्या कामकाजाची वेळ सध्या असलेल्या वेळेपेक्षा एकूण ४५ मिनिटांनी वाढविण्यात येत आहे, पैकी नेहमीच्या वेळेपेक्षा सोमवार ते शुक्रवार सकाळी १५ मिनिटे अगोदर आणि ३० मिनिटे उशिरा पर्यंत कामकाजाची वेळ यापूर्वी विहित वेळेमध्ये वाढविण्यात येत आहे.

(३) तसेच सर्व कार्यालयांतील शिपायांसाठी कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील.

(४) उपरोक्त कार्यालयीन वेळेमध्ये दुपारी २.०० ते २.३० अशी अर्धा तास भोजनाची सुट्टी अंतर्भुत असेल.

(५) ज्या महानगरपालिका कार्यालयांना कारखाना अधिनियम लागू आहे किंवा औद्योगिक विवाद अधिनियम लागू आहे किंवा ज्यांच्या सेवा अत्यावश्यक म्हणून समजल्या जातात अशा कार्यालयांना, तसेच शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक), अग्निशमन दल, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन इ. विभागांतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ५ दिवसाच्या आठवड्याबाबतचे आदेश लागू राहणार नाहीत.

(६) सदरचे कार्यालयीन आदेश दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून अंमलात येतील.

तरीकर्मचारी व प्रशासकीय /राज्य शासनाचे निर्देशानुसार पुणे महानगरपालिका अधिकारी .मे , कार्यालयांचे कामकाजाचे वेळेत उपरोक्त प्रमाणे बदलकेल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/११४२ दि.२७/२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २२९२ त्वर्य**

प्रभाग क्र.८ ड पुणे महानगरपालिका प्रवेशद्वार ते पुणे मुंबई रस्ता संत तुकाराम महाराज शिल्पाजवळ विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर.पी.चित्रोडा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,५७,७५,४१४=०४ पेक्षा १३.७६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३६,०४,७१७=०७ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.१८,९३,०४९=६९ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.२,८२६=८० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ६१,५८४/- पर्यंत अधिक अटी शर्तीतील सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११२८,दि.२४/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२९३ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यातील रेकॉर्ड जतन करणेसाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये अग्निशामक यंत्रणा उभारणे, व्हर्टिकल स्टोरेज बसविणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदित्य इन्फ्रासेफ्टी सोल्युशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६२,४३,५६२=२४ पेक्षा ०.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,८१,७५०=९७ पर्यंत काम करुन घेणेस अधिक जी.एस.टी.र.रू.७,४९,२२६=२७ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ५,६७१/- पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११२९,दि.२४/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२९४ त्वर्य**

स्वामीनारायण मंदिरा समोरील पूल सुशोभिकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार प्रवीण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४०,०२,७२३=११ पेक्षा १२.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,२१,९९६=०६ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी.र.रू.४,८०,३२६=७६ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.१३,४२७=३० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २,६२५/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/११३१,दि.२४/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२९५ त्वर्य**

सिंहगड रोड वडगाव बु. स.नं.३० पासून पु.ल.देशपांडे उद्यान पर्यंत ७.५० मी. रूंदीचा डी.पी.रस्ता कॅनॉलकडेने विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,६०,९०,९४५/- पेक्षा ३.४०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,६९,७८,०३७=१३ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस, अधिक जी.एस.टी.र.रू.३१,३०,९१३/- पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.८२,१३३/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २,५१,८५७/- अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११३२,दि.२५/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२९६ त्वर्य**

प्रभाग क्र.२८ ब मध्ये विविध ठिकाणी थर्मोप्लास्ट पेंट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रविण कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२६,७३,०००/- पेक्षा ७.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४,६८,२४८=२० पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी.र.रू.३,२०,७६०/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११३३,दि.२५/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२९७ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालये,प्रसुतिगृहे व दवाखान्यांकडील मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक बायोमेडिकल उपकरणांची वार्षिक देखभाल दुरूस्ती करून घेणेसाठी खालीलप्रमाणे रक्कम रूपये ३२,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये बत्तीस लाख फक्त ) पर्यंत वर्गीकरणाव्दारे आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/११३४ दि.२५/०२/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, ७ रूग्णालये,प्रसुतिगृहे औषधालये इ. RE17F196, पुणे मनपाच्या रूग्यालयाकडील डिजीटल एक्स-रे, सोनोग्राफी व व्हेंटिलेटरचे देखभाल दुरूस्ती करणे | ३२,००,०००/- | ---- |
| सुचवलेले काम<br>सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका, RE17F139, ७ क रूग्णालये, प्रसुतीगृह औषधालये इ. रूग्णालयातील मशिनरी व इतर देखभाल दुरुस्ती | ---- | ३२,००,०००/- |

**विषय क्रमांक :– २२९८ त्वर्य**

भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली वाहने घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.के.टुरिस्ट ॲण्ड ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,००,००,०००/– पेक्षा २% जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०२,००,०००/– पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर टेंडर अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११३५,दि.२५/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २२९९ त्वर्य**

कॅनॉल कलर्व्हट ते फुरसुंगी कचरा डेपो दरम्यान अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेल्या ओढ्यातील मुख्य मलवाहिन्यांची दुरूस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बारटक्के कंन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३१,९६,३७१/– पेक्षा २६.६७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२३,४३,८९८=८५ व अधिक जी.एस.टी. र.रु. ३,४१,२६७=८६ एकुण र.रुपये २६,८५,१६६=७१ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/११३९ दि.२७/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २३०० त्वर्य**

सन २०२०–२१ या आर्थिक वर्षातील मिळकत कराची देयके, वॉरन्ट, नोटीसेस वाटप व इतर बाबत खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/१२७९ दि.४/२/२०१९ चे पत्र.

1. **नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांतील मिळकत धारकांसह पुणे महापालिकेच्या अंदाजे ११ लाख मिळकतधारकांना सन २०२०–२१ या आर्थिक वर्षातील नव्याने तयार होणारी देयके, वॉरन्ट, नोटीसेस, नागरिकांस पाठवावयाची पत्रे यांचे वाटप केंद्र सरकारच्या पोस्ट विभागामार्फत करणेस तसेच सदरील वाटपाचे कामी आवश्यकतेनुसार पोस्ट विभागास वेळोवेळी ॲडव्हान्स रक्कम उपलब्ध करून देणे व ॲडव्हान्स रकमांची वेळोवेळी रिकूपमेंट करणेस,**
2. **उपरोक्त बिलांचे वाटप करणेकामी पोस्ट विभागास इनलॅण्ड पत्र असल्यास प्रतीपत्र रू. २=५० + फ्रँकींग खर्च रू. ०=४० + हाताळणी खर्च रू. ०=३० याप्रमाणे प्रतीपत्रास एकूण रू. ३=२० तर आंतर्देशिय (इनलॅण्ड लेटर) पत्रव्यवहाराव्यतिरिक्त पत्रव्यवहाराकरीता प्रतीपत्र रु. ५/– + हाताळणी खर्च रु. ०=७० याप्रमाणे प्रतिपत्रास एकूण रु. ५=७० याप्रमाणे रक्कम अदा करणेस.**
3. **पोस्ट विभागाच्या दरात बदल झाल्यास वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारीत दराने रक्कम अदा करणेचे अधिकार मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका यांना देणेस,**
4. **मिळकत कर मुदतीत भरल्यास मिळकत धारकांना देण्यात येणाऱ्या सवलतीबाबत व मुदतीत कर न भरल्यास आकारण्यात येणाऱ्या दंडाबाबत जनजागृती करणेसाठी –**
   - **पुणे शहरातील गजबजलेली ठिकाणे / चौक इ. ठिकाणी आकाशचिन्ह परवाना विभाग यांचे माध्यमातून दिशादर्शक कमानीवर व इतर दर्शनी ठिकाणी पोस्टर व बॅनर्स, फ्लेक्स, बोर्ड लावणेस. आवश्यकतेनुसार हॅण्डबीलांची छपाई करून नागरिकांस वाटप करणेस,**
   - **प्रेसनोटच्या माध्यमातून जाहिरात करणेस,**
   - **आवश्यकतेनुसार खासगी जाहिरातदाराकडून योग्य त्या छापील जाहिराती, दृक–श्राव्य (व्हिडीओ–ऑडीओ) स्वरूपातील जाहिराती तसेच सोशल मिडीयासाठी आवश्यक त्या जाहिराती तयार करणे व त्यांचे प्रेक्षपण रेडीओ, चित्रपटगृहे, खासगी चित्रपटगृहे तसेच खासगी ठिकाणी करून जनजागृती करणेस,**
5. **उपरोक्त क्र. १ ते ४ मध्ये नमूद कामाकरीता येणारा खर्च सन २०२०–२१ चे अर्थसंकल्पातील अर्थशिर्षक ''RE11G103 मुख्य देखरेख वसुली वगैरे छ कर आकारणी व कर संकलन कार्यालय ३ संकीर्ण'' चे अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस,**

**विषय क्रमांक :– २३०१ त्वर्य**

Supply, Installation, Commissioning of २०० MTPD Mixed waste processing plant at Uruli Dewachi/Fursungi and its Operation & Maintenance for period of 15 years (बी–२ पध्दत) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.भूमी ग्रीन एनर्जी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १) स्थापत्यविषयक कामे र.रुपये ७,९२,५२,४००/– २) विद्युत व यांत्रिकीविषयक कामे र.रुपये १५,५८,४४,३८४=१६ एकूण (१+२) र.रु.२३,५०,९६,७८४=१६ (सर्व करांसहित) व ३) १५ वर्ष देखभल दुरूस्तींचे काम र.रू.५०२/– प्रती मे.टन (सर्वकरांसहित) प्रति वर्ष ८.५% वाढ पर्यंतची निविदा प्राप्त झालेली असून त्यांचेकडून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्यव./११४३ दि.२७/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २३०२ त्वर्य**

पुणे पेठ हडपसर स.नं.१६४ (पार्ट) येथील विठ्ठलराव तुपे क्रीडा संकुल या ठिकाणी नव्याने बांधण्यात आलेल्या तळमजला + १ मजल्याच्या बॅडमिंटन हॉल, जलतरण तलाव, योगा हॉल/जिम लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र.१ चे निविदाधारक एच टू क्यू अक्वा फन अनलिमिटेड पुल्स पत्ता ५५७/१, शुक्रवार पेठ, पुणे–०२ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.१,१८,८९९ (र.रू. एक लाख अठरा हजार आठशे नव्याण्णव फक्त) मनपाने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा र.रु. ४१,५२८/– ने अधिक दराने त्यांची निविदा स्विकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारांनी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमेप्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/१०५६,दि. ६/२/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७२ दि.१४/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– २३०३ त्वर्य**

प्रभाग क्र.७ सर्वे नं.२४,फायनल प्लॉट न.५३, पीएमसी कॉलनी, मुंबई पुणे रोड वाकडेवाडी, पुणे ३ येथे मनपाची वसाहत असून या वसाहतीतील रहिवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची टाकी आहे. पिण्याच्या पाण्याची टाकी ५० वर्षापूर्वीचे बांधकाम असलेली टाकी आहे. ही टाकी जुनी झालेली असल्याने टाकी पडून दुर्घटना होण्याची शक्यता आहे. तरी या ठिकाणी २४ X ७ या योजना अंतर्गत नवीन टाकी बांधण्यास मान्यता मिळणेबाबत मा. सौ.सोनाली संतोष लांडगे यांचे दि.११/१/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६९ दि.१४/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– २३०४ त्वर्य**

बाणेर स.नं.१११ (पैकी) येथील एस टी चे आरक्षण असलेली सुमारे १४,३०६ चौमी खुली जागा पुणे महानगर परिवहन महामंडळास इलेक्ट्रिक बसडेपो विकसित करणेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून रीतसर मागणी होईपर्यंत अथवा ५ वर्षे कालावधी यापैकी कमी कालावधीकरिता मासिक भाडे रक्कम रू.७,९३,९८३/– इतकी आकारणी करून हस्तांतरीत करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१००३,दि. २२/१/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७१ दि.१४/२/२०२० विचारासाठी.

**विषय क्रमांक :– २३०५ त्वर्य**

मिळकतकराची थकबाकी वसूल होण्यासाठी व पालिकेचे उत्पन्न वाढीसाठी मिळकत कर अभय योजना राबविणेबाबत मा.ॲड्.अविनाश साळवे यांचे दि.२०/११/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १५९० दि. २६/११/२०१९, मा.विशाल धनवडे व मा.प्रमोद ओसवाल यांचे दि.६/२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २४७१ दि. १४/२/२०१९, मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.१५/१/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २०६९ दि. २१/१/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/११३० दि.२४/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**